# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५१ /२०१०

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | : | श्री गंभीरा सी. गरफाडे तर्फे<br>डॉमनिक जार्ज फ्रेंक<br>राहणार गधे घाट, मनपा झोन च्या मागे,<br>न्यु कॉलनी, नागपुर |
| | | – विरूध्द – |
| गैरअर्जदार | : | कार्यकारी अभियंता,<br>सिव्हील लाईन विभाग, नाशप,<br>म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,<br>नागपुर. |
| गणपुर्ती | : | 1) श्रीमती मीरा खडक्कार<br>सभापती,<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपुर. |
| | | 2) श्रीमती के.के घरत<br>सदस्य–सचिव,<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपुर. |
| | | 3) श्रीमती गौरी चांद्रायण,<br>सदस्या<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच,<br>नाशप, नागपुर. |

— आदेश ——

पारीत दि. ०२.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ०७.०७.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. अर्जदार श्री डॉमनिक जॉर्ज फ्रेंक, रा. गधेघाट न्यु कॉलोनी, नागपुर यांनी अवाजवी विद्युत देयके येण्याबाबत गैरअर्जदारास तक्रार अर्ज माहे मे २०१० मध्ये सादर केला होता. परंतु तक्रारीची दखल घेण्यात आली नाही तसेच दिनांक ०६.०७.२०१० रोजी विद्युत पुरवठा खंडीत करण्याची आगाऊ नोटीस अर्जदारास मिळाली, त्यामुळे विद्युत देयकाची तक्रार प्रलंबित असतांनासुध्दा विद्युत पुरवठा न खंडीत करण्याबाबत अंतरीम आदेशा करिता अर्जदाराने दिनांक ०७.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली कि

अ. विद्युत कायदा २००३ कलम ५६ (१) अनुसार देण्यात आलेली विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस रद्द करण्यात यावी.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारी अर्जात असे नमुद केले आहे की अर्जदार हे तीन ते चार महिन्यापुर्वी सदर विज जोडणी असलेल्या घरात राहण्यास आले होते त्यापुर्वी मीटर वाचनानुसार बरोबर विद्युत देयक मिळत होते. परंतु एप्रिल २०१० पासुन त्यांना अवाजवी विद्युत देयक देण्यात येत आहेत. यासंबंधी गैरअर्जदारास त्यांनी दिनांक ११.०५.१० व १६.०६.२०१० ला तक्रार केली आहे. तसेच सदर तक्रारीचे समाधान न करता दिनांक ०६.०७.२०१० रोजी थकबाकीची रक्कम न भरल्यास विद्युत पुरवठा खंडीत करण्याची आगाऊ नोटीस पाठविण्यात आली. तेव्हा योग्य विद्युत देयक मिळण्याबाबत कलम ५६ (१) अन्वये देण्यात आलेली नोटीस रद्द करण्याकरीता व अर्जदारास झालेल्या त्रासाबद्दल रू. ५०००/– नुकसान भरपाई देण्याची विनंती अर्जदाराने मंचाला केली आहे.

३. दिनांक ०८.०७.२०१० गैरअर्जदारातर्फे उपकार्यकारी अभियंता एम.आर. एस. उपविभाग, यांनी मंचात उत्तर दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की सदर विज जोडणी ही श्री गंभीर गरफाडे यानावाने आहे. अर्जदाराने एप्रिल २०१० मधील ४७४ युनिट वापर व रू. २,९६१.९४ रक्कम असलेले विद्युत देयका बाबत तक्रार दाखल केली आहे. तसेच मागील 1 ½ वर्षापासुन वीजेचा वापर कमी जास्त प्रमाणात होत आहे. मीटर तपासणी मोहीमे अतंर्गत अर्जदराच्या नादुरूस्त मीटर एप्रिल २०१० मध्ये बदलविण्यांत आले व त्याला ४०० युनिटची आकारणी करण्यात आली आहे.

४. गैरअर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की तक्रार दाखल झाल्यानंतर अर्जदारांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा करून व त्यांच्या सहमतीने ४०० युनिटची आकारणी करण्यात आली ही ४०० युनिटची आकारणी अर्जदाराच्या घरी जोडलेल्या वीज भाराच्या आधारे करण्यात आली आहे. अर्जदाराच्या घरी एकुण संलग्न भार ०.९७५ कि.वॅ. असुन, डायवरसिटी व लोड फॅक्टर ०.२ घेण्यात आले आहेत. तसेच हे युनिट तीन महिन्यात विभाजीत करून 'स्लॅब बेनिफीट' देण्यात आले. तरीही अर्जदाराने मार्च महिन्यापासुन विद्युत देयक भरणा केले नाहीत. तेव्हा नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा खंडीत करण्याची आगाऊ नोटीस दिनांक ०४.०७.१० रोजी अर्जदारास देण्यात आली. गैरअर्जदाराने आपल्या उत्तरात मंचास विनंती केली आहे की, अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा व वाद नसलेल्या विजेच्या देयकातील थकीत रकमेची वसुली करण्याची परवानगी द्यावी.

५. दिनांक ०९.०७.२०१० रोजी मंचात अंतरिम आदेशाकरीता सुनावणी करण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते, गैरअर्जदारातर्फे श्री जी.टी. सोरते, उपकार्यकारी अभियंता, एम.आर.एस. उपविभाग हे उपस्थित

होते. अर्जदारातर्फे प्रतिनिधी श्री सुनिल जेकब यांनी अर्जदाराची बाजु मांडतांना मंचाला सांगितले की अर्जदाराचे मीटर बरोबर असुन मीटरची चाचणी अर्जदारा समक्ष करण्यात यावी, व त्यानंतरच तक्रारीचे निराकरण करण्यात यावे. गैरअर्जदाराने संयुक्त मीटर चाचणी बाबत संमती दर्शविली.

६. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर मंचाने संयुक्तपणे मीटर तपासणी करून दिनांक १७.०७.२०१० रोजी मंचाची कार्यवाही पुढे सुरू ठेवण्याचे तोंडी आदेश दिले.

७. दिनांक १७.०७.२०१० रोजी मंचाची कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली. परंतु अर्जदार प्रतिनिधी सुनावणी करिता हजर न राहता मंचाला सुनावणीची कार्यवाही पुढे ढकलण्याकरिता विनंती अर्ज सादर केला. त्यामध्ये असे नमुद केले की त्यांनी १२.०७.२०१० रोजी मीटर चाचणीचे पैसे भरून दुस–या दिवशी पैसे भरणा केलेल्या पावतीची प्रत सिव्हील लाईन्स विभागामध्ये सादर केली आहे. परंतु गैरअर्जदारातर्फे कुठलीही सुचना न मिळाल्याने मीटरची चाचणी होऊ शकली नाही. मीटर चाचणी हा सुनावणीचा मुख्य आधार आहे, तेव्हा मीटर चाचणी होईस्तेवर सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती अर्जदार प्रतिनिधी यांनी हया मंचात दाखल केलेल्या पत्रात नमुद केलेली आहे.

८. वरील पत्राविषयी मंचाने जेव्हा गैरअर्जदारास विचारणा केली, तेव्हा त्यांनी सांगितले कि अदयापही मीटरचाचणी फी भरणा केलेली पावती त्यांच्या कार्यालयास मिळाली नाही. तेव्हा मंचाने गैरअर्जदारास तोंडी आदेश दिले कि अर्जदार प्रतिनिधीला संपर्क करून मीटर चाचणी करून त्यांचा अहवाल मंचात सादर करण्यांत यावा.

९. मीटर अहवाल मंचात ०३.०८.१० रोजी दाखल करण्यात आला. मीटर चाचणी अहवालानुसार मीटर सदोष आहे. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्रावरून मंचाचे असे मत आहे कि सदर तक्रार अर्जदाराने मीटर दुरूस्त असतांना सुध्दा एप्रिल २०१० ला देण्यात आलेल्या अतिरिक्त ४०० युनिट व त्यानंतर आलेल्या विद्युत देयकाबाबत केली आहे. परंतु मीटर चाचणी अहवालानुसार मीटर सदोष आहे. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या अटी) विनियम, २००५, कलम १५.४.१ अनुसार "मीटर सदोष असेल तर, तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यात आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यात आला असेल तर, सदोष असल्याचे ज्या महिन्यांत निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येईल". त्यामुळे गैरअर्जदारातर्फे देण्यात आलेले समायोजीत देयक जोडलेल्या वीज भारानुसार योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

१०. तसेच गैरअर्जदारातर्फे वेळोवेळी अर्जदाराच्या तक्रारीची दखल घेण्यात आल्याचे लक्षात येते, तेव्हा अर्जदारास झालेला त्रास सिध्द होत नाही. त्यामुळे अर्जदाराची त्रासाबद्दल भरपाईची मागणी मान्य करता येत नाही. तसेच देण्यात आलेले विद्युत देयक योग्य असल्याने अर्जदाराला सदर देयक भरणे बंधनकारक आहे. तेव्हा गैरअर्जदारातर्फे विद्युत कायदा २००३, कलम ५६ (१) अन्वये देण्यात आलेली नोटीस रद्द करण्याची अर्जदाराची मागणी सुध्दा मान्य करता येत नाही.

## आदेश

दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केल्यानंतर अर्जदाराचा तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |